उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था ही कौशल्य विकास व उद्योजकता या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्याबाबत........

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्र.कौविउ-२०१५/प्र.क्र.२१/प्रशा-१**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक :- ०६/०४/२०१५.**

वाचा :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(१७७/२०१०)/व्यशि-५, दि.२९/१२/२०१०.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(४७/२०१२)/व्यशि-५, दि.०५/०६/२०१२.

३) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.एईओ-१०१५/प्र.क्र.०६/२०१५/दहा, दि.१५/०१/२०१५

**प्रस्तावना :-**

रोजगाराबाबत बदलत्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच या कार्यक्रमाकडे अधिक प्रभावीपणे लक्ष पुरविले जावे या उद्देशाने केंद्र शासनाने स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता या मंत्रालयाची निर्मिती केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये देखील स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त दि.१५/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२ पर्यंत संपूर्ण भारतातील जवळपास ५० कोटी व्यक्तींना रोजगार प्राप्त होण्यासाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्यात सन २०२२ पर्यंत ४.५० कोटी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावयाचे आहे. याद्दष्टीने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत तसेच महाराष्ट्र शासनाच्या ध्येय धोरणानुसार राज्यामध्ये कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या अनुषंगाने कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरीय नोडल संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेची स्थापना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या उक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या वर नमूद दिनांक १५/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे कौशल्य विकास व उद्योजकता विभाग असे नामकरण करण्यात येऊन

विभागासाठी प्रधान सचिवांचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले आहे. कौशल्य विकास व उद्योजकतेसंबंधी राज्यातील विविध उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि संनियंत्रणाची जबाबदारी या नवनिर्मित विभागाकडे सोपविण्यात आली आहे. ही बाब लक्षात घेता कौशल्य विकासाशी निगडित कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २९/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये स्थापित महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था ही कौशल्य विकास व उद्योजकता या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

महाराष्ट्र राज्यामध्ये कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता तसेच राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमास दिशा व गती देण्याकरिता राज्यस्तरीय नोडल संस्था म्हणून स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था ही नव्याने स्थापित कौशल्य विकास व उद्योजकता या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

या निर्णयाच्या अनुषंगाने नवनिर्मित विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणास अनुसरुन महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेच्या संरचनेतील विविध घटकांमध्ये आवश्यक ते बदल तसेच निधीच्या स्त्रोतासंबंधी अर्थसंकल्पीय शीर्षकाचे हस्तांतरण इ.बाबींबद्दल कार्यवाही संबंधितांनी तातडीने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४०७१४५४५६७५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Employment and self employment, postalCode=400032, st=maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2015.04.07 15:05:39 +05'30'

**( उषा प्र.महाजन )**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे मुख्य सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अ.मु.स., सामान्य प्रशासन विभाग (र व का) यांचेकडे कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अंतर्गत विषय वाटपानुषंगाने उचित कार्यवाहीसाठी सादर.
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
९. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, कोकण भवन, नवी मुंबई.
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, कफ परेड, एम.टी.एन.एल. बिल्डिंग, ४ था मजला, कुलाबा, मुंबई-०५.
११.संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महा.राज्य, मुंबई.
१२.संचालक (शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महा.राज्य, मुंबई.
१३.महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१४.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१५.सह सचिव (व्यशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
१७.निवडनस्ती (प्रशा-१)